
सहितौ
सर्व मराठीसाठी, मराठी सर्वांसाठी !
अंक ३, माघ कृ. नवमी, शके १९४०.
फेब्रुवारी, २०१९.
मराठी वाङ्मय मंडळ
डी.जी.रुपारेल महाविद्यालय

## मार्गदर्शक मंडळ

डॉ. तुषार देसाई (प्राचार्य)

प्रा. वैशाली जावळेकर (मराठी-विभागप्रमुख)

डॉ. अनघा मांडवकर (मराठी विभाग)

## संपादकीय मंडळ

सावनी गोगटे
वैष्णवी वाणी
प्रचिती परब
रुतिका कांबळे
नम्रता लोखंडे
प्रशांत पालटे
अदिती तरडे
रोहिणी नाईक

## मुखपृष्ठ आणि अन्य सजावट

वैष्णवी वाणी
सावनी गोगटे

# *अनुक्रमणिका*

❖ **संचिताचे कवडसे** ('विवेकसिंधु')

❖ **मायबोली** (मालवणी)

❖ **धूळपाटी**
(स्व-रचित काव्यस्पर्धेतील कविता व अन्य कविता)

❖ **वाचू आनंदे** ('शांतता! कोर्ट चालू आहे')

❖ **तुम्हाला माहीत आहे का ?**

❖ **खेळातून मराठीकडे**

❖ **शब्द शब्द जपुनी ठेव**

❖ **थोडेसे चिवित्र**

❖ **मराठी-वाङ्मय-मंडळाचे उपक्रम**

# संपादकीय

मराठीच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि जतन-संवर्धनासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत आणि ते सर्व स्तरांवर केले गेले पाहिजेत ही 'सहितौ' ह्या नियतकालिकाची भूमिका आहे. ह्या नियतकालिकाचा तिसरा अंक (२०१८-२०१९ ह्या शैक्षणिक वर्षातील पहिला अंक) मराठी-राजभाषादिनाच्या प्रसंगी प्रकाशित करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. ह्या अंकात समाविष्ट असलेली सदरे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रेरणा देतील अशी आहेत. मनोरंजनासोबतच हसतखेळत मराठी शिकण्यासाठी 'शब्द शब्द जपुनी ठेव', 'तुम्हाला हे माहीत आहे का ?', 'खेळातून मराठीकडे' ह्यांसारखी सदरेही ह्या अंकात समाविष्ट करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा ह्या हेतूने विद्यार्थ्यांनीच रेखाटलेल्या चित्रांचाही ह्या अंकात समावेश केला आहे. मराठी-वाङ्मय-मंडळाने ह्या वर्षाच्या पहिल्या सत्रात आयोजित केलेल्या उपक्रमांचे वृत्तान्तही ह्या अंकात समाविष्ट केले आहेत.

ह्या वर्षी नाटककार विजय तेंडुलकर ह्यांच्या निधनास दहा वर्षे पूर्ण होत आहेत. ह्या निमित्ताने 'सहितौ' परिवारातर्फे विजय तेंडुलकर ह्यांच्या नाटकाच्या परीक्षणाच्या माध्यमातून त्यांना आदरांजली अर्पण करीत आहोत. सर्वांना मराठी-राजभाषादिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

# संचिताचे कवडसे

## विवेकसिंधु

(मराठी भाषेला मध्ययुगीन काळापासून गद्य-पद्य साहित्याची संपन्न परंपरा लाभली आहे. नव्या पिढीला तिचा परिचय करून देण्याच्या उद्देशाने विविध कालखंडांतील मराठी साहित्य-संचितातील काही अंश ह्या सदरात समाविष्ट करण्यात येणार आहेत. ह्या अंकात श्रीमुकुंदराज-लिखित 'विवेकसिंधु' ह्या साहित्यकृतीचा परिचय करून देत आहोत.)

**विवेकसिंधु**

'मराठी भाषेचे आद्य कविकीर्ती' म्हणून श्रीमुकुंदराज प्रसिद्ध आहेत. मराठी भाषेच्या ग्रंथकर्तृत्वाची सुरुवात आठशे वर्षांपूर्वी मुकुंदराज ह्यांनी केली. मराठी भाषेतील हा पहिला गद्य ग्रंथ समजला जातो. परंतु एके काळी मराठी भाषेत ग्रंथरचना करणे जोखमीचे होते. त्याकाळी संस्कृतमधूनच आपल्या विचारांना वाचा फोडण्याची वहिवाट होती. संस्कृतव्यतिरिक्त अन्य प्राकृत भाषांत रचना करणे हा समाजाच्या आणि तत्कालीन शासनाच्याही दृष्टीने महान अपराध समजला जात होता, म्हणूनच ज्ञानेश्वर-तुकाराम ह्यांना हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या. परंतु हे असिधाराव्रत ज्ञानेश्वरांच्याही आधी तब्बल एकशे दोन वर्षांपूर्वी त्यांच्याच नाथपंथातील एका महापुरुषाने स्वेच्छेने स्वीकारले. त्या महापुरुषाचे नाव होते मुकुंदराज.

'विवेकसिंधु' ह्या आपल्या ग्रंथामध्ये मुकुंदराजांनी आपल्या गुरुपरंपरेचा उल्लेख केला आहे. त्यांच्यातील आदिनाथ चैतन्यरूपाने अंभोरा येथे निवास करीत आहेत. हरिनाथांचे बालपणापासूनचे सारे वास्तव्य अंभोरा येथेच राहिले. त्यांचे

शिष्य आणि मुकुंदराज ह्यांचे गुरू रघुनाथ ऊर्फ रामचंद्र हेदेखील आपल्या गुरूच्या सान्निध्यातच आपले जीवन व्यतीत करत होते. आपल्या ग्रंथाच्या शेवटच्या अध्यायात मुकुंदराज ह्यांनी आपल्या ह्या दोन्ही ज्येष्ठांची योग्य शब्दांमध्ये स्तुती केली आहे. विवेकसिंधुमधील दुसरी त्रयी पुढील ओव्यांमध्ये पूर्वार्धाच्या अखेरीस मुकुंदराजांनी कथन केली आहे -

"नृसिंहाचा बल्लाळू । तेयाचा पुत्र जैतपाळू ।

तेणे केला रोळू । ग्रंथरचनेचा ।।"

मुकुंदराजांनी आपला विषय समजावून देण्याकरिता जी विविध उपमाने वापरली आहेत, त्यांच्याद्वारे तत्कालीन परिस्थितीवर थोडा प्रकाश पडू शकतो. औषधांसंबंधीचे संदर्भही 'विवेकसिंधु'मध्ये येतात. हा ग्रंथ मुकुंदराज ह्यांनी विशिष्ट हेतू समोर ठेवून रचलेला आहे. "शांकरोक्तीवरी। मिया बोलती वैखरी" हे विधान येते. 'विवेकसिंधु'त आलेल्या विविध संदर्भांवरून त्यांनी उपयोगात आणलेल्या ग्रंथांची संख्या पंचवीसपर्यंत असल्याचे लक्षात येते.

मुकुंदराज ह्यांनी आपल्या 'विवेकसिंधु' ह्या ग्रंथाची विभागणी दोन भागांमध्ये केली आहे. अठरा प्रकरणांचा हा ग्रंथ पूर्वार्धात सात प्रकरणे आणि उत्तरार्धात अकरा प्रकरणे अंतर्भूत करून सिध्द झाला आहे. पूर्वार्धाला 'सृष्टिक्रम' असे नाव देण्यात आले. उत्तरार्धास 'संहाराक्रम' हे नाव देण्यात आले आहे. आपल्या ग्रंथलेखनाला आशीर्वाद लाभावा म्हणून प्रारंभी मुकुंदराज ह्यांनी श्री शंकराची स्तुती केली आहे. 'ज्ञानावाचून ब्रह्मप्राप्ती नाही' हे त्यांचे आग्रही प्रमेय आहे.

संकलन - **आरती ढोले.**

(माजी विद्यार्थिनी.)

संदर्भ - बोरकर, हरिश्चंद्र : २००२; *मुकुंदराजरचित मराठीतील आद्यग्रंथ विवेकसिंधु*; पुणे : अक्षय प्रकाशन.

# मायबोली

## मालवणी

**मालवणी बोली व तिचे प्रभावक्षेत्र :**

मालवणी ही कोकण प्रदेशातील बोली असून, तेथील सारे लोकव्यवहार ह्याच बोलीतून होताना दिसतात. कारवारपासून गोमंतकासह रत्नागिरीपर्यंत कोकण प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीला पूर्वी 'कोकणी' असे संबोधिण्यात येत असे, मात्र गोवा राज्याच्या निर्मितीनंतर कारवार व गोवा प्रांतात बोलली जाणारी कोकणी ही गोवा राज्याची स्वतंत्र भाषा म्हणून मान्यता पावली. दक्षिण रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत बोलली जाणारी 'मालवणी' ही बोली कोकणीहून बऱ्याच अंशी भिन्न असल्याचे दिसते.

दक्षिण कोकणातील दोडामार्ग, सावंतवाडीपासून वेंगुर्ला, मालवण, देवगड, फोंडा, वैभववाडी ते राजापूर अशा अरबी समुद्राच्या किनारपट्टीचा प्रदेश आणि गोमंतकांचा सावंतवाडी तालुक्याचा सीमेलगतचा प्रदेश हे ह्या बोलीचे प्रभावक्षेत्र होय. संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा आणि रत्नागिरी जिल्ह्याचा दक्षिण भाग ह्या बोलीच्या प्रभावाखाली येतो. मालवणी ह्या बोलीला 'कुडाळी' असेही संबोधिले आहे.

**साहित्य :**

मालवणीतून लोकगीते, लोककथा रचल्या जात होत्या. गाऱ्हाणी, उखाणे, म्हणी, झोपाळागीते तसेच फातुकले ह्या प्रकारातही मालवणीचा वापर होतो. म्हणजे ती साहित्याची भाषा म्हणून येथे वापरली जाते. तसेच गावदेवस्थानातील गाऱ्हाणी, पडस्ताळा ह्यांत आणि पंचमंडळींत ह्या बोलीचा वापर केला जातो. ह्या अर्थाने ती कायद्याची भाषा आहे. तथापि मच्छिंद्र कांबळी ह्यांच्या मालवणी नाटकांमुळे ह्या बोलीला मालवणी असे संबोधिण्यात येऊ लागले. किंबहुना अनेक

साहित्यिकांनीही कथा, कादंबरी आणि काव्य, नाटकांसाठी ह्या बोलीचे उपयोजन केलेले दिसते.

**लोकगीत :**

*(मालवणी)*

बामनाचा गंगूबाय, गेला पान्याक झऱ्यार
घागर भरी चुमळकरी, पुन सगळं धेन जोग्यार
गंगूबाय गेला जोग्यावांगडा
एक रान दोन रान अशी, वलांडली सात राना
तेवा गंगूबाय बोले कशी,
"आरे जोग्याजी मेल्या, माका तान लागली"
"व्हतस भावाशीचा लाडक्या
कित्यास इलस् जोग्यावांगडा"
"आरे जोग्याची, तुज्या आवशीक रे खाव
माका भूक लागली”
"व्हतस बापाशीचा लाडक्या
खेका इलय जोग्यावांगडा"
"आरे जोग्या, तुज्यार पडो शिरा
माका झॉप इली"
"व्हतस आवशीचा लाडक्या कित्या इलस जोग्यावांगडा"
"आरे जोगड्या, तुका येवो फटकीचा दुकना"

*(मराठी)*

ब्राम्हणीची गंगूबाई
पाण्यासाठी झऱ्यावर गेली.

तिने घागर भरली. चुंबळ केली.
तिथे असलेल्या एका जोग्यावर आहे लक्ष.
ती गेली त्याच्यासंगे
सात रानं ओलांडली, तशी ती म्हणाली,
"अरे मेल्या जोग्या, मला तहान लागली,"
तो म्हणाला, "जर भावाची लाडकी होतीस,
तर माझ्यासंगे का आलीस?"
"अरे जोग्या, मला भूक लागली."
"वडिलांची लाडकी होतीस,
तर जोग्यासंगे का आलीस?"
"अरे जोग्या, मला झोप आलीय."
"जर आईची लाडकी होतीस तर
जोग्यासंगे का आलीस?"
"अरे जोग्या तुला पटकी होऊ दे रे.
माझ्या पायाला फोड आलेत."

**विशेष शब्द** :

| *(मालवणी)* | *(मराठी)* |
|---|---|
| हाड | घेऊन ये |
| ज्येवा | जेव्हा |
| सोमतो | ताबडतोब |
| व्हर | घेऊन जा |
| कित्याक | का |

**म्हणी :**

१) रांधी ती पडली सांदी, वाडी ती इली उजवाडी. - रांधणाऱ्याऐवजी वाढणाऱ्याचे कौतुक.

२) शेजारणीच्या रसा, घावने करून बसा ! - जो दुसऱ्यावरी विसंबला, त्याची फजिती होते.

**वाक्प्रचार :**

| *(मालवणी)* | *(मराठी)* |
| --- | --- |
| १) काट्याशिवाय गोटो उतरना. | मासळीखेरीज जेवण जमेना. |
| २) शिमग्या आधी पॉस. | कामाआधी लाभ मिळवण्याचा प्रयत्न. |

**संदर्भ** :- जाखडे, अरुण (संपा.), देवी, गणेश (प्रकल्प-संपादक) : २०१३; *भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण – महाराष्ट्र*; पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

संकलन - **प्रशांत पालटे, रोहिणी नाईक.**

तृतीयवर्ष (कला).

# धूळपाटी

(पूर्वीच्या काळी मुले धूळपाटीवर अक्षरे गिरवायची ह्या सदरात समाविष्ट केलेले विद्यार्थ्यांचे लेखनाचे चुकतेमाकते प्रयत्न म्हणजे जणू सर्जनशीलतेच्या धूळपाटीवर त्यांच्याकडून गिरवली जात असलेली धुळाक्षरेच होत, असे म्हणता येईल.)

*दरवर्षीप्रमाणे २०१७-२०१८ ह्या शैक्षणिक वर्षात मराठी स्वरचित काव्य स्पर्धा आयोजित केल्या होत्या. काव्यस्पर्धेतील पारितोषिक-विजेत्या विद्यार्थ्यांच्या कविता ह्या सदरात समाविष्ट करीत आहोत. ह्या स्पर्धेच्या परीक्षक प्रा. माधवी राव (मराठी विभाग, कनिष्ठ महाविद्यालय) ह्यांचे आभार आणि सर्व पारितोषिक-विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !*

## *काव्यस्पर्धेतील कविता :*

***प्रथम क्रमांक***

**एकली**

कशा साहल्या मूकवेदना
तुझ्याविना सखया रे !
कधी न कळल्या तुला मनीच्या
नि:शब्द यातना रे !

पाझरले मम अश्रू,
ओठी नाव तुझे ते आले.
दिन-राती रे ह्या नयनांनी
तुलाच मी पाहिले.

जरी बंदिनी होते त्याची,
संगिनी तव जन्मांची;
तरी सांग का हृदयी तुझिया
शंका मम शुद्धीची ?

का ना दिसली डोळां तुझिया
खूण अपुल्या प्रीतीची ?
हृदयी कायम ज्योत तेवली
जरी राघवप्रतिमेची !

पांघरलेला होता कायम
तव स्पर्शांचा शेला,
स्पंदनात अन् मनोमनी रे
तूच तूच भरलेला ...

सावलीही ना कधी स्पर्शिली
आसक्त त्या गात्रांनी,
तरी रेखिली मम सामोरी
चिता अग्निदिव्यांनी.

वियोगिनी मी, नयनी पाणी,
राहिलास तरी निश्चल.
सांग कसे ना द्रवले पाहून
ह्या सीतेचा छल ?

ज्ञात कधी नव्हते का तुजला
पावित्र्य जानकीचे ?
विसरलास तव प्रजेसाठी का
कर्तव्य तू पतीचे ?

ज्या साथीने चढले होते
मंदिर मी सौख्याचे,
का ठरावे तेच रघुवरा
कारण मम दुःखाचे ?



संचित माझे तूच घडविले
तुझ्याच रे वचनांनी,
का मग आता दूर लोटसी
सांग तुझी ही स्वामिनी ?

भूमिजा मी तुझी धर्मिणी
तुजसाठी रे जगले,
सारे वाहून अंती रामा
एकलीच मी उरले ...

- **वैदेही उदय मुळ्ये.** (तृतीयवर्ष, कला).
चित्र - **सोनाली जाधव.** (द्वितीयवर्ष, कला).

*द्वितीय क्रमांक*

**सतत सतत धावता धावता**

सतत सतत धावता धावता
थोडे थांबायचे राहून गेले,
पहिल्या नंबरात पास होताना
एकदा नापास होण्याचे राहून गेले !

दप्तराचे ओझे उचलताना
कागदी होड्या सोडायचे राहून गेले;
पाऊस मुसळधार कोसळत होता,
फक्त भिजायचे राहून गेले !

मेसेज आणि नोटिफिकेशनच्या गोंधळात
तुला एकदा तीन-पानी पत्र लिहायचे राहून गेले,

गणितातली प्रमेये सोडवताना
प्रेमात पडायचे राहून गेले !
लपूनछपून बघता बघता
तुला बघतच राहायचे राहून गेले;
पाऊस मुसळधार कोसळत होता,
फक्त भिजायचे राहून गेले !

लख्ख दिव्यांच्या झगमगाटात
तुझ्या डोळ्यांचे चांदणे शोधणे राहून गेले,
साऱ्यांसाठी खर्च होताना
थोडे उरायचे राहून गेले !

सरले किती ? उरले किती ?
हिशोब सारे राहून गेले,
रोज थोडे मरतामरता
जगणे मात्र राहून गेले !

पाऊस मुसळधार कोसळत होता,
फक्त भिजायचे राहून गेले ...

**- उर्वी भट.**
(पदव्युत्तर प्रथमवर्ष, माहिती-तंत्रज्ञान विभाग.)

*तृतीय क्रमांक*

**तो देव दगडात नाही**

आसमंती कारभार ज्याचा,
मातीच्या कुशीत आसरा ज्याचा,
कणाकणात ज्याचं अस्तित्व राही,
तो देव दगडात नाही.

देहाच्या आत्म्यात तो असे,
हृदयाच्या अंतरी तो वसे,
भक्ताचे कल्याण सदैव पाही,
तो देव दगडात नाही.

आहे तो पर्वतात आणि दरीत,
पृथ्वीवरील तोच हरीत,
प्रेमाच्या मंजूळ झऱ्यात जो वाही,
तो देव दगडात नाही.

पाहा त्याला मुलांमध्ये, पंगूंमध्ये, गरजूंमध्ये,
सदा असे तो मानवतेच्या धर्मामध्ये,
मानवाकडून मानवतेसाठी करवतो काही,
तो देव दगडात नाही.

म्हणतो तो, "सदा मानव कल्याण करा,
मनात सेवेचा निर्धार धरा,
मी सदैव सद्भक्तांच्या अंतरी राही,
कारण मी खरा देव, जो दगडात नाही."




- **विदुला पालेकर.** (तृतीयवर्ष, विज्ञान.)
चित्र - **यश सुतार.** (कनिष्ठ महाविद्यालय, विज्ञान.)

*उत्तेजनार्थ*

**पांढऱ्याच्या शोधात ...**

एकदा एका पारावर
सभा भरली रंगांची।
गप्पागप्पांमधून
ठिणगी पडली वादाची।।

नको होती पांढऱ्याला
कल्पनाही भांडणाची।
अचानक उठून त्याने
वाट धरली शांततेची।।



बाहेर पडले सारे रंग
शोधाया पांढऱ्याला।
कळेच ना त्यांना
शांतता हवी त्याला।।

एकी सोडून सर्व
आपापसांत होते भांडत।
गर्वाने स्वतःचाच
तोरा होते मिरवत।।

भगव्याला पटत नव्हते
हिरव्याचे मनोगत।
निळाही ऐकेना
भगवा काय होता सांगत ?

विचारांच्या पाटांनी
बदलल्या आता दिशा।
तिरंग्याला पाहवत नव्हती
तिरंग्याचीच दशा।।

वाटेत एकदा तिरंग्यावर
आले मोठे संकट।
बाकी सारे लपले
खाकीच होता लढत।।

प्रश्न स्वसन्मानाचा तेव्हा,
कणखर झाले मनगट।
भांडणाचे रूपांतर झाले
युद्धाचे रणशिंग फुंकत।।

उमगेना त्यांना त्यांच्या
मिश्रणात निर्मिती पांढऱ्याची।
उज्ज्वल, मार्गदायी सूर्यकिरणेही
असतात सात रंगांची।।

मिसळून सारे रंग
वाढते शोभा रांगोळीची।
कोण समजावेल व्याख्या
एकीच्या बळाची।।

कारण होते फक्त
स्वअस्मितेच्या ठिणगीचे।
झाले युद्ध शेवटी
रणांगणावर रंगांचे।।

वाहू लागले पाट
केवळ लाल पाण्याचे,
कोणासही ओळखता येत नव्हते,
कोणते रक्त कोणाचे ?
कोणते रक्त कोणाचे ?

- **प्रचिती नारायण परब.** (प्रथमवर्ष, कला.)

चित्र - **समीर दरेकर.** (कनिष्ठ महाविद्यालय, वाणिज्य.)

*उत्तेजनार्थ क्रमांक -*

**तुझ्या रंगात रंगुनी माझा हा रंग वेगळा**

पुसेन खरंतर सारंच, पण आठवणींना येई उधाण;
तुझ्या रंगाचे शिंतोडे जरी, तरी वाटे येतं एक तूफान.
हळवी होऊन मिटून जाई पापणी,
कोरडी जरी, तरी आणे डोळ्यांत पाणी.
डोळे उघडून नव्याने कवेत घेते जगाला,
तिथे न थांबता रस्ता शोधते आपला.
ह्या विरहाला लावू मी अर्थ कोणता ?
तुझ्या रंगात रंगुनी माझा हा रंग वेगळा...

तू बांधलेल्या प्रेमाच्या कुंपणाला स्वीकारून,
तिथेच रमवू कशी मी स्वतःला ?
त्या अंगणात तुझ्या गुलाबाच्या सोबतीला
प्राजक्त लावून मी आणेन शोभा अंगणाला.
लाल-पांढऱ्याच्या ह्या भेटीने नव्या रंगाचा जन्म होईल,
आपला गंध राखून तुझ्या गंधात मिसळून जाईन,
तुझ्यात असुनी असेल माझा एकांत निराळा,
तुझ्या रंगात रंगुनी माझा हा रंग वेगळा...

वाट मी पाहत राहीन मावळत्या सूर्यासारखी,
ढग बाजूला सारेन, पण तू दिसशील का रे त्या किनारी ?
वाळूत लिहिलेलं माझं नाव सागर मिटवून टाकेल,
माझ्या चेहऱ्याचं प्रतिबिंब मात्र त्याच समुद्रात दिसेल.
त्या पाण्यात पावले भिजविण्यासाठी, असशील का रे तू आसुसलेला ?
का मी मावळल्यावर, लागशील परतीच्या मार्गाला ?
प्रेमाआधी कर्तव्य, माझ्या मावळण्याची ही रीत कळेना;
तुझ्या रंगात रंगुनी माझा हा रंग वेगळा...

गर्दीतली आपल्यामधली शांतता नसे आवडत मला,
हक्काने तुझ्यावर रागावेन, पण प्रेमाने समजावेन तुला.
चूक माझी असता माफी तुझी लाख मागेन,
तुझी सगळी गोड थट्टा मी हसत-खेळत स्वीकारेन.
एक हसू पाहण्यासाठी दमले तरी हसवेन मी अनेकदा,
आपल्या भेटीचे ते क्षण जाऊ देईन कशी मी लयाला ?
गाणे तुझे असेल, पण साथ देईल माझा गळा,
तुझ्या रंगात रंगुनी माझा हा रंग वेगळा...

- **अदिती तासकर.**
(प्रथमवर्ष, कला.)

*उत्तेजनार्थ क्रमांक*

**आपण सारेच कलाकार आहोत ! ...**




मित्रा, आपण सारेच कलाकार आहोत.
आपणच उभारलेलं नेपथ्य,
आपणच केलेली प्रकाशयोजना,
आपणच दिलेलं संगीत;
इथे लाकडाचं स्टेज नाही,
पण जगाचा रंगमंच आहे.
तू पात्र,
मी पात्र,
भोवतालचं हे जगही पात्रच आहे;
पण इथले प्रेक्षक मात्र आपणच आहोत,
आपण सारेच कलाकार आहोत ! ...

बघ ना मजा !
अजाणतेपणी खोटे खोटे खेळ करतो,
खोटं विश्व उभारून क्षणात पृथ्वीवरून अवकाशात झेप होते,
कधी हातातल्या मोटारीचे विमान होते,
ॲबस्ट्रॅक्ट कल्पनेसारखे काहीतरी सुचत राहते,
आणि बालपण स्टेज-लिबर्टी घेऊन चौकटी मोडू लागते !
मग आई उगाच भीती घालते,
"धूरवाला बाबा येईल,
पोत्यात भरून घेऊन जाईल."
आपणही वेडे उगाच घाबरतो,
नाटकातल्या घाबरल्यासारखे खोटे- खोटे;
आपण सारेच कलाकार आहोत ! ...

मग संवाद सुरू होतो,
संपादानुरूप टोन कळतो,
चुका समोर आल्या की आपली 'एक्टिंग' सुरू होते,
मग समोरील व्यक्तीदेखील "नाटक करू नको" म्हणते,
खोटा आविर्भाव तोंडी घेऊन पात्र प्रवास करते,
रंगमंचावरच्या अवकाशाची खोली जाणवायला लागते.
कुठे कुठे हसू अनावर होते,
तर कुठे अवकाशातल्या अंधारातले अश्रू वाट काढतात,
कधी कधी पात्रांसमोर किंवा एकटेच
गर्रकन फिरल्यावर क्षणात कॅरेक्टर बदलते,
दिग्दर्शकाने दिलेली कमांड निमूट पाळावी लागते,
तर कधी पॉज घेऊन शांतता ऐकावी लागते,
नाही तर नवरसांचा रसास्वाद घेऊन गिव्ह-टेक चालू असते;
काही काही पात्रं मध्येच एक्झिट घेऊन जातात,
पण आपण मात्र नाटक चालू ठेवायचे असते,
तर ... आपण सारेच कलाकार आहोत ! ...

मित्रा,
प्रत्येक अंकागणिक कथा पुढे सरकते,
येणारी पात्रं दोन डायलॉग्जमधील बिटवीन द लाइन्स शिकवतात,
तर काही काही वाक्यं आयुष्याची स्पेस दाखवतात;
जगण्याच्या प्रयोगासाठीच्या खटपटीत पात्र-प्रसंग इतके होतात की,
त्यात कळत नाही, लेखकाने लिहिलेली संहिता संपली आहे;
मग भरतराज्याची आस लागते,
सगळ्या पात्रांना कडकडून मिठी मारावीशी वाटते;
हे स्टेज नव्हते तरीही इथे रंगमंचावरचा प्रकाश कमी होतो,
संगीत शांततेत बदलतं,
चेहऱ्यावर भाव म्हणून निर्विकारपणा येतो,
नाटक संपून पडदा पुन्हा पडतो,

लांब कुठेतरी प्रेक्षकांच्या खुर्च्यांमध्ये कुणीतरी टाळ्या वाजवते,
ते आपणच असतो – एकटेच,
आणि आपण एक्झिट घेतो कुठल्यातरी ब्लॅकआऊटमध्ये,
पुन्हा नवा प्रयोग करण्यासाठी;
खरंच, आपण सारेच कलाकार आहोत ! ...

- **योगेश उतेकर.** (द्वितीयवर्ष, कला.)

संगणकीय चित्र - **श्रद्धा कदम.** (तृतीयवर्ष, कला.)

## *अन्य कविता :*

### वीरपुत्र

गेला तो सोडून आईला,
पहिल्या मातेची सेवा कराया,
सावरून सारे कार्य इथले,
विविध त्यांच्या तऱ्हा ह्या ...

टोपी घालुनी माथ्यावरी
हातात उभी पिस्तूल घेऊनी,
पडला घराबाहेर एकेकाळी
जीव घट्ट मुठीत ठेवुनी.

झेलले त्याने वार सारे
मनाचा क्षल्य दगड करुनी,
सीमेवर धाडला गेला पुत्र तो
कुटुंबाची तिलांजली देऊनी.

देशावर जडतो जीव त्याचा,
देशावर फार प्रेम त्याचे,
युद्धसमयी प्राण तो वाहतो,
जशी गुलाबाची पाकळी झडते.

मनात ध्यास घट्ट घेऊनी
रक्षण करी तो आपुले,
आईसाठी प्राण वेचताना
त्याला देशाचे वचन स्मरले.



हृदय पत्थराचे करुनी,

सक्षम त्याचा देह हा,

देशाचा विचार प्रथम करणारा

आईने घडवला वीरपुत्र हा ...

- **मैत्रेयी नितीन रावते.** (प्रथमवर्ष, वाणिज्य.)

चित्र - **प्रतीक्षा तांबे.** (प्रथमवर्ष, कला.)

**शाळेशी नातं**




नेहमी आपण आपल्या शाळेची आठवण काढतो,

कारण शाळा आपल्या आयुष्यातला

एक खूप महत्त्वाचा, संस्मरणीय भाग असतो.

आपलं शाळेशी नातं वेगळंच असतं,

पण

आपल्या शिक्षकांचं काय ?

त्यांनी तर अनेक पिढ्या घडवलेल्या असतात,

त्यांचं काय नातं असेल शाळेशी ?


कधी कोणी विचार केला आहे का ?
शिक्षक जेव्हा निवृत्त होत असतात तेव्हा ...
किंवा
हल्ली मराठी शाळेमधून पुरेशी विद्यार्थी-संख्या नसल्यामुळे,
अनेक वर्षं शिकवण्याचं कार्य करणाऱ्या शिक्षकांना कसं वाटत असेल ...
कधी विचार केला आहे का कोणी ?
जेव्हा त्यांची बदली केली जाते,
त्याचं त्या ज्ञाननगरीशी नातं तुटतं,
तेव्हा त्यांच्या हृदयातील आठवणींचा एक कप्पा पण
त्या शाळेत नक्कीच राहत असेल ...

- **श्रावणी पाटील.** (द्वितीयवर्ष, कला.)

चित्र - **समीर दरेकर.** (कनिष्ठ महाविद्यालय, वाणिज्य.)

# वाचू आनंदे

(ह्या सदराच्या माध्यमातून नव्या -जुन्या पुस्तकांची विद्यार्थ्यांनी लिहिलेली परीक्षणे मांडली जाणार आहेत. ह्या वर्षी नाटककार विजय तेंडुलकर ह्यांच्या निधनास दहा वर्षे पूर्ण होत आहेत. ह्या निमित्ताने 'सहितौ' परिवारातर्फे विजय तेंडुलकर ह्यांना सदर ग्रंथपरीक्षणाच्या माध्यमातून आदरांजली अर्पण करीत आहोत.)



(चित्र :- आंतरजाल.)

**ग्रंथपरीक्षण: 'शांतता ! कोर्ट चालू आहे'**

मराठी रंगभूमीला भारतीय रंगमंचावर आणि जागतिक रंगभूमीवर स्वतःची स्वतंत्र ओळख ज्या नाटककारांच्या नाटकांतून प्राप्त झाली, त्यांमधील कदाचित सर्वांत महत्त्वाचे नाव म्हणजे नाटककार विजय तेंडुलकर. विजय तेंडुलकरांची कारकीर्द आणि त्यांची नाटके ह्यांविषयी सर्व परिचित आहेत. त्यांच्या निधनाला दहा वर्षे झाली. ह्या निमित्ताने त्यांच्या स्मृती जागविण्यासाठी आणि आताच्या पिढीपर्यंत त्यांचे नाटक पोहोचविण्यासाठी विजय तेंडुलकरांच्या महत्त्वाच्या नाटकांपैकी 'शांतता! कोर्ट चालू आहे' ह्या नाटकाचे हे पुस्तक-परीक्षण लिहीत आहे. विजय तेंडुलकर ह्यांचे हे नाटक फार गाजले. ह्या नाटकामुळे त्यांना नाटककार म्हणून प्रसिद्धीही मिळाली. त्यांची बहुतांश नाटके म्हणजे माणसांचा कोंडमारा दर्शविणारा आरसाच जणू. त्याच प्रकारचे हे नाटक आहे.

राज्य-नाट्यस्पर्धेमध्ये 'रंगायन' ह्या प्रायोगिक नाट्यसंस्थेसाठी तेंडुलकरांनी हे नाटक लिहिले. ह्या नाटकाचा पहिला प्रयोग दिनांक २० डिसेंबर, १९६७ रोजी रवींद्र नाट्यगृहात सादर केला गेला. मौज प्रकाशनाने १९६८ साली हे नाटक प्रकाशित केले. 'शांतता ! कोर्ट चालू आहे' हे नाटक तीन अंकांचे आणि ९० पृष्ठांचे आहे. पुस्तकाचे जर मुखपृष्ठ पाहिले, तर आपल्याला न्यायाधीशांचा मुखवटा दिसतो, जो वसंत सरवटे ह्यांच्या कल्पनेतून साकारला आहे. विजय तेंडुलकर ह्यांनी हे नाटक आपल्या आईला समर्पित केले आहे. ह्या पुस्तकामध्ये नाटकाची संहिता, दिग्दर्शकाची निर्मिती-प्रक्रिया, नाटककाराची नाट्यलेखन-प्रक्रिया ह्यांबद्दल विवेचन आले आहे. ह्या पुस्तकाच्या शेवटी डॉ. श्रीराम लागू ह्यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि जाणकार अभिनेत्याची प्रतिक्रियाही वाचायला मिळते. त्याचप्रमाणे 'शांतता ! कोर्ट चालू आहे' ह्या नाटकाचे दिग्दर्शक अरविंद देशपांडे ह्यांचेही ह्या नाटकाच्या दिग्दर्शनाबद्दलचे मनोगत पुस्तकात समाविष्ट आहे. त्यामुळे दिग्दर्शनाच्या दृष्टीनेही हे पुस्तक उपयुक्त आहे.

'शांतता ! कोर्ट चालू आहे' ह्या नाटकात एकूण आठ पात्रे आहेत. त्यामध्ये दोन स्त्री-पात्रे आहेत - कुमारी लीला बेणारे आणि सौ. काशीकर. सौ. काशीकर ह्या सामान्य स्त्रियांचे प्रतिनिधित्व करतात, तर कु. लीला बेणारे ही स्वतःच्या मनाप्रमाणे वागणाऱ्या म्हणजेच समाजाने आखून दिलेल्या चुकीच्या चौकटीविरुद्ध वागणाऱ्या स्त्रियांचे प्रतीक आहे. काशीकर हे नाटकातील न्यायाधीश, तर सुखात्मे हे वकील आहेत. बाळू रोकडे, पोंक्षे आणि कर्णिक हे साक्षीदार म्हणून वावरताना दिसतात. हे नाटक म्हणजे कु. लीला बेणारेची शोकांतिका आहे. हे पात्र पहिल्या अंकात अतिशय खेळकर आणि विनोदी स्वरूपात मांडले आहे, पण बेणारे बाई आतून गंभीर आणि दुखावलेली आहे. तिचे वैयक्तिक आयुष्य सर्वस्वी तिच्या हातात आहे, परंतु सुखात्मे, काशीकर, पोंक्षे, कर्णिक, रोकडे, सौ. काशीकर ह्या सर्व पात्रांचे म्हणणे आहे की, तिचे निर्णय चुकीचे आहेत.

नाटकातील 'सामंत' ह्या पात्राला कोर्टाबद्दल काही माहीत नाही आणि त्याला कोर्टाचे कामकाज दाखविण्यासाठी असलेला कोर्टाचा खेळ म्हणजे पूर्ण नाटक आहे. ह्यामध्ये कु. लीला बेणारेला भ्रूणहत्येच्या गुन्ह्यासाठी आरोपी ठरवले जाते आणि सर्वांच्या साक्षीतून वेगळेच पण सत्य बाहेर येते. हातातल्या पुस्तकातला वाचलेला मजकूर सामंत उत्साहाने सांगतो आणि मग माणसांतला पशू बाहेर

येतो. सर्वजण साक्ष देतात आणि सिद्ध करतात की, कु. लीला बेणारे हिच्या पोटात वाढणारे बाळ हे तिच्या प्रोफेसर दामले ह्यांच्याशी असलेल्या अनैतिक संबंधांचे फळ आहे. ह्या समाजातील माणसे वेगवेगळी पाहिली तर घाबरट आहेत, पण एकत्र आली की एखाद्या व्यक्तीची कशी शिकार करतात, हे नाटकात दाखवले आहे. समाजाचा हिंस्त्रपणा नाटकात दिसतो. विजय तेंडुलकर ह्यांच्या नाटकातील स्त्रिया ह्या माणूस आहेत आणि तशाच त्या जगतात. त्यामुळे ज्या वासना पुरुषांमध्ये आहेत त्या स्त्रियांतही आहेत. त्या वासनेला बेणारे बळी पडली, कुमारी-अवस्था असताना तिने स्वतःचे शरीर दुसऱ्याच्या अधीन केले, हा सर्वस्वी तिचा निर्णय होता. त्यात समाजाला लुडबूड करण्याची काही गरज नाही. स्त्रीने सभ्यपणे समाजाने आखून दिलेल्या चौकटीतच वावरले पाहिजे ह्यावर तेंडुलकर घाला घालतात. समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी हे नाटक अत्यंत महत्वाचे आहे, असे मला वाटते.

ह्या नाटकातील बेणारेचे स्वगत मला खूप आवडले. नि:स्वार्थीपणे प्रेम करून तिने कोणतीही चूक केली नाही, हे तिच्या स्वगतातून आपल्या लक्षात येते. पण स्वगत म्हणजे केवळ तिच्या मनातले भाव आहेत. ते फक्त प्रेक्षकांसाठी आहेत, तिचे उद्गार नाटकातील पात्रांना ऐकू येत नाहीत. कारण त्यांना ते ऐकायचेच नाहीत. मला ह्या नाटकातील अजून एक आवडलेली गोष्ट म्हणजे नाटकाचा शेवट. कोर्टाचा खेळ संपल्यानंतर 'आम्ही त्यातले नव्हेच' हा जो काही ती पात्रे आव आणतात, तो खूप महत्त्वाचा आहे. "एवढं काय मनाला लावून घेतेस बेणारे, नाटकच होतं ते." हा सौ. काशीकरांचा संवाद-अंश आहे, तो अत्यंत सूचक आहे. 'एखाद्याची चिरफाड केल्यानंतर मलमपट्टी लावणे' हे समाजाचे चित्र तिथे आपल्याला दिसते. ह्या कशालाही दाद न देता बेणारे निपचित पडून राहते. मग सामंत सहानुभूतीपूर्वक आपल्या हातांतील हिरवाजर्द कापडी पोपट तिच्याजवळ ठेवतो. आणि तिच्याच आवाजातले स्वर ऐकू येऊ लागतात -

"चिमणीला मग पोपट बोले,
का गं तुझे डोळे ओले ?
काय सांगू बाबा तुला,
माझा घरटा कोणी नेला ?"

आणि नाटक करुणात्मक भावनेने समाप्त होते.

'व्यक्तीविरुद्ध व्यवस्था' हा संघर्ष मांडत असताना आपल्या समाजातील स्त्रीची घुसमट आणि कोंडी सूक्ष्म निरीक्षणानिशी आपल्याला दाखवणारे हे नाटक आहे.विजय तेंडुलकर ह्यांनी त्या काळात नाटकातून दाखवलेली परिस्थिती आज फारशी बदलली, असे आपल्याला दिसत नाही. आजही समाजात स्त्रियांना स्वतःचे मन मारून तसेच स्वतःचा तोल सावरतच जगावे लागते. एका बाजूने विचार केला, तर तेंडुलकरांचे लिखाण हे स्त्रीवादी नव्हे; पण जे स्त्रीवादाच्या दृष्टिकोनातून अभ्यास करत आहेत, त्यांच्यासाठी ह्या नाटकातील आणि तेंडुलकरांच्या इतरही नाटकांतील स्त्री-पात्रांची चित्रणे अभ्यसनीय ठरतात.

त्यामुळे मला असे वाटते की, जे नाटकाचा अभ्यास करताहेत, जे साहित्याचा अभ्यास करताहेत, जे समाजातील स्त्रियांचा अभ्यास करताहेत, मुख्य म्हणजे जे माणसांचा अभ्यास करू इच्छितात, त्यांनी हे नाटक वाचावे. आणि अर्थातच, विजय तेंडुलकर ह्या नाटककाराचा जे अभ्यास करत आहेत, त्यांनी हे नाटक वाचावे. मला हे नाटक अत्यंत आवडले. मी आवर्जून सांगेन, हे नाटक नक्की वाचा आणि प्रयोग पाहायला मिळाल्यास नक्की पहा.

- **प्रचिती नारायण परब.** (द्वितीयवर्ष, कला.)

# तुम्हाला हे माहीत आहे का ?

(मराठी ही आपली निजभाषा, प्रिय भाषा आणि कित्येकदा ज्ञानभाषा, व्यवसायभाषा असली; तरी मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती ह्यांविषयी अनेक गोष्टी आपल्याला ठाऊक नसतात. त्या माहीत आहेत का, हे आपले आपल्याशी पडताळण्यासाठी एक छोटासा आरसा असे ह्या सदराचे स्वरूप आहे. ह्या सदरात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आम्हाला sahitau.marathi@ruparel.edu ह्या ई-पत्त्यावर अवश्य कळवा. अचूक उत्तरे पाठवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे पुढील अंकात छापण्यात येतील.)

१. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त केलेले पहिले मराठी साहित्यिक कोण ?

२. प्र. के. अत्रे यांनी लिहिलेला सुप्रसिद्ध विडंबन-काव्यसंग्रह कोणता व तो कोणत्या साली प्रकाशित झाला ?

३. पहिले विश्वमराठी साहित्यसंमेलन कोणत्या वर्षी आणि कोठे झाले व त्याचे अध्यक्ष कोण होते ?

४. पाचव्या व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट-महोत्सवात मराठीतील  कोणत्या चित्रपटाला पुरस्कार मिळाला?

५. 'महाराष्ट्र भाषेचे पाणिनी' हा मान कोणाला दिला जातो ?

संकलन - **वैष्णवी वाणी.** (तृतीयवर्ष, कला.)

# खेळातून मराठीकडे

(मराठीविषयीच्या भाषिक क्षमता वाढविण्याकरिता काही रंजक खेळ ह्या सदरात समाविष्ट करण्यात येतील. ह्या वेळी 'शब्दांची लपाछपी' हा खेळ देत आहोत. असे काही खेळ माहीत असल्यास किंवा बनविले असल्यास, त्यांविषयी 'सहितौ'ला अवश्य कळवावे.)

*प्रत्येक ओळीत एका अर्थाचे २ शब्द दडलेले आहेत, ते शब्द शोधून सांगा.*

१. प प प्र म ता रा क्र
२. प्र अ चि भ व नु ती
३. ग आ ना ष्ट ल ले त
४. स्मा अ अ क न त चा क
५. नी सि वा स ष्ण वा सु
६. अ त अ णि र्या ग द म
७. ण ण र आ व स्म ठ
८. ता र क त व म णी उ
९. आ आ व च्छा ण र न द
१०. त मे न म श्र ह

संकलन – **सावनी गोगटे.** (तृतीयवर्ष, कला.)

# शब्द शब्द जपुनी ठेव

(भाषासमृद्धीच्या दृष्टीने, मराठी भाषेतील शब्दसंपदा वाढवायला हवी, त्याबरोबर ती वापरायलाही हवी; ती वापरण्यासाठी ती माहीत व्हायला हवी. नेमक्या ह्याच भूमिकेतून प्रत्येक अंकात काही पारिभाषिक शब्दांचा परिचय करून देणार आहोत.)

| | | |
|---|---|---|
| १. | Mutual missing | चुकामूक |
| २. | Telegraph office | तारघर |
| ३. | Hypothesis | अभ्युपगम |
| ४. | Log | ओंडका |
| ५. | Seminar | चर्चासत्र |
| ६. | Workshop | कार्यशाळा |
| ७. | Resignation | राजीनामा |
| ८. | Recommendation | शिफारस |
| ९. | Anaesthetist | भूलतज्ज्ञ |
| १०. | Ticket | दर्शिका |

संकलन - **सावनी गोगटे.** (तृतीयवर्ष, कला.)

# थोडेसे चिवित्र






**श्रद्धा कदम.**

(तृतीयवर्ष, कला.)

# मराठी वाङ्मय मंडळाचे उपक्रम - अहवाल




*२०१८-२०१९ ह्या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्रात मराठी-वाङ्मय-मंडळातर्फे आयोजित झालेल्या विविध उपक्रमांचा वृत्तान्त :*

**वारी : एक जीवनानुभव**

दि. २४ जुलै, २०१८ रोजी आषाढी एकादशीनिमित्त डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी-वाङ्मय-मंडळाने ‘वारी : एक जीवनानुभव’ हा कार्यक्रम आयोजित केला होता. ह्या कार्यक्रमाच्या संवादक रुपारेल महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. विद्या पाटील आणि भौतिकशास्त्र विभागातील अध्यापक डॉ. मुग्धा पत्की ह्यांनी त्यांना वारी करताना आलेल्या अनुभवांचे कथन केले.

आषाढी एकादशीला चंद्रभागेच्या वाळवंटावर महाराष्ट्रभरातून लाखोंच्या संख्येने वारकरी येतात, उराउरी भेटतात, आनंदकल्लोळात नाचतात. वारीविषयीचे आपले असेच स्वानुभव सांगताना दोन्ही संवादकांनी वारीचा इतिहास, वारकऱ्यांची निस्सीम श्रद्धा, वारीच्या ठिकाणचे चोख व्यवस्थापन ह्यांविषयी कथन केले. ह्याप्रसंगी त्यांनी वारीची काही क्षणचित्रे आणि ध्वनिचित्रफिती सादर करून एकूण वातावरण भक्तिमय केले.

ह्या कार्यक्रमाची सुरुवात सावनी गोगटे आणि अन्य विद्यार्थ्यांनी सोपानदेव चौधरी ह्यांची सुरेल रचना गाऊन केली. रोहिणी नाईक ह्या विद्यार्थिनीने सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ह्या प्रसंगी रुपारेलचे प्राचार्य डॉ. तुषार देसाई, उपप्राचार्य डॉ. दिलीप मस्के, मराठी-विभागप्रमुख प्रा. वैशाली जावळेकर आणि इतर प्राध्यापकही उपस्थित होते. रुपारेलच्या विद्यार्थ्यांनी ह्या कार्यक्रमाच्या निमित्ताने वारीचा आनंद लुटला. दिव्या गिलबिले ह्या विद्यार्थिनीने केलेल्या ऋणनिर्देशानंतर सर्व उपस्थितांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

- **सावनी गोगटे.** (तृतीयवर्ष, कला.)



## बोलू ऐसे बोल






डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी-वाङ्मय-मंडळाने दि. ७ ऑगस्ट, २०१८ रोजी 'बोलू ऐसे बोल’ हा कार्यक्रम आयोजित केला होता. रुपारेलच्या माजी विद्यार्थिनी प्रसिद्ध माध्यमकर्मी अनघा मोडक ह्यांनी 'बोलू ऐसे बोल' ह्या विषयावर संवाद साधला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीयवर्ष कला शाखेच्या सावनी गोगटे आणि प्रशांत पालटे ह्या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात स्वरसाधना गटातील काही विद्यार्थ्यांनी रुपारेल-गीत गाऊन केली. ह्या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार देसाई, मराठी-विभागप्रमुख प्रा. वैशाली जावळेकर, प्रा. माधवी राव तसेच इतर प्राध्यापक उपस्थित होते.

अनघाताईने विद्यार्थ्यांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. तिच्या स्वानुभवकथनातून प्रत्येकाला आयुष्य आनंदाने जगण्याची प्रेरणा मिळाली. अनघा ताईने का बोलावे, काय बोलावे, कोणासाठी बोलावे, कसे बोलावे, शब्दांशी कसे खेळावे, शब्दांना आपलेसे करून ह्या मनीचे भाव त्या मनापर्यंत कसे पोहोचवावे, ह्यांविषयी उत्तम मार्गदर्शन केले. ताईच्या शब्दमैफिलीत सर्वजण रंगून गेले होते.

अनघाताईच्या व्याख्यानापूर्वी गतवर्षीच्या स्वरचित काव्यस्पर्धेचे बक्षीस-वितरण करण्यात आले. व्याख्यानानंतर प्रशांत पालटे ह्या विद्यार्थ्याने अनघाताईविषयी कविता सादर करून ताईला शब्दरूपी स्नेहभेट दिली. सूरज खरटमल ह्या विद्यार्थ्याने केलेल्या आभारप्रदर्शनानंतर पसायदान गाऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

- **प्रचिती परब** (द्वितीयवर्ष, कला),

**जुईली जोशी** (तृतीयवर्ष, कला).

---

## संवाद-कौशल्यविषयक कार्यशाळा

मराठी वाङ्मय मंडळातर्फे संवाद-कौशल्यांविषयीची सहा सत्रांची कार्यशाळा घेण्यात आली. दि. २४ ऑगस्ट, २०१८ ते दि. ३१ ऑगस्ट, २०१८ ह्या कालावधीत सदर कार्यशाळा संपन्न झाली. विविध माध्यमांतील आणि जीवनातील संवाद-कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात व्हावीत हे ह्या कार्यशाळेचे उद्दिष्ट्य होते. प्रसिद्ध माध्यमकर्मी आर.जे. रश्मी वारंग, आर.जे. मयुरेश शिर्के आणि आर.जे. गणेश आचवल ह्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यशाळा आयोजित केली गेली होती.

आर.जे. मयुरेश शिर्के ह्यांनी आवाजसाधना, सादरीकरण-कौशल्ये आणि संभाषण-कौशल्ये ह्या विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी आवाजाची काळजी घेण्याविषयी, तसेच ध्वनिक्षेपकाचा वापर कशा पद्धतीने करावा आणि सादरीकरण करताना किंवा मुलाखत घेताना कोणती दक्षता घ्यावी ह्यांविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून सादरीकरण आणि मुलाखतीचे प्रात्यक्षिक करवून घेतले. आर.जे. रश्मी वारंग ह्यांनी आकाशवाणीवरील निवेदन

आणि लेखन-वाचन ह्या विषयांवर मार्गदर्शन केले; त्याचबरोबर काही विषयांवर उत्स्फूर्त लेखनही करवून घेतले. आर.जे. गणेश आचवल ह्यांनी निवेदन आणि सूत्रसंचालन ह्या विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले. प्रसंगावधान अंगी बाणावे, हजरजबाबीपणाचा वापर कसा करावा, कार्यक्रमाचे सूत्र कशा पद्धतीने जोडावे ह्याबद्दल त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

दि. ३१ ऑगस्टला विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतून शिकलेल्या अनेक गोष्टींसंबंधी आविष्कार सादर करून दाखवला. ह्या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार देसाई उपस्थित होते. त्यांनी आपले महाविद्यालय जर स्वायत्त झाले तर अभ्यासक्रमात संवाद-कौशल्ये असा विषय अंतर्भूत करण्याचा मानस व्यक्त केला. ह्या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ.दिलीप मस्के, मराठी-विभागप्रमुख प्रा. वैशाली जावळेकर आणि इतर प्राध्यापक ह्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले; आणि पसायदानाने कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

- **प्रचिती परब.** (द्वितीयवर्ष, कला.)



## कवितेच्या वाटेने

दिनांक ८ सप्टेंबर, २०१८ रोजी मराठी-वाङ्मय-मंडळाने 'कवितेच्या वाटेने' हा कार्यक्रम आयोजित केला होता. ह्या कार्यक्रमात संवादक म्हणून पत्रकार आणि कवी श्री. वैभव चाळके उपस्थित होते. त्यांनी कवितेची जडणघडण, कवितेचे प्रवाह ह्यांविषयी संवाद साधला. कविता आणि कवी ह्यांतील संबंध, कवितेतून होणारी अभिव्यक्ती ह्यांविषयी मांडणी केली. त्यांनी आपल्या काही कविता, चारोळ्या सादर करून स्वतःचा काव्यप्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला.

ह्या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. दिलीप मस्के, डॉ. नीता ताटके, मराठी-विभागप्रमुख प्रा. वैशाली जावळेकर आणि इतर प्राध्यापकही उपस्थित होते. ह्या कार्यक्रमात मराठी कवितेच्या वाटचालीविषयीही सर्वांना माहिती मिळाली. ह्या कार्यक्रमाची सांगता अमृता आरभावी हिने केलेल्या आभारप्रदर्शनाने झाली.

- **जुईली जोशी.** (तृतीयवर्ष, कला.)

---

## ‘अभिवाचन-कट्टा’ ( कोकण-मराठी-साहित्यपरिषद - युवाशक्ती)

दि. ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी मराठी-वाङ्मय-मंडळ, डी. जी. रुपारेल महाविद्यालय आणि कोकण-मराठी-साहित्यपरिषद ह्यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभिवाचन-कट्टा' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. वेगवेगळ्या प्रकारच्या साहित्यकृती किंवा त्यांतील महत्त्वाचे वेचक भाग घेऊन, अशा उत्कृष्ट साहित्याचा विद्यार्थ्यांना आस्वाद-परिचय करून द्यावा, हा ह्या अभिवाचन-कट्ट्याचा मुख्य उद्देश होता.


सदर कार्यक्रम दि. ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी रुपारेल महाविद्यालयातील २ विज्ञान येथे सकाळी १०:३० वाजता सुरू झाला. कोकण-मराठी-साहित्यपरिषदेतून आलेल्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त 'गांधीगिरी' ही नाटिका सादर केली. तसेच प्रसिद्ध लेखक रंगनाथ पठारे ह्यांच्या 'चक्रव्यूह' ह्या साहित्यकृतीतीलही निवडक भाग सादर झाला. त्यानंतर रुपारेलमधील मराठी-वाङ्मय-मंडळाच्या सदस्यांनी कविता महाजन ह्यांना काव्यमय श्रद्धांजली म्हणून त्यांच्या काही कविता अभिवाचनाच्या माध्यमातून सादर केल्या. अतिशय रंगलेल्या ह्या कार्यक्रमाच्या शेवटी, कोकण-मराठी-साहित्यपरिषदेच्या विद्यार्थी-सदस्यांनी विजय तेंडुलकर ह्यांच्याविषयीच्या एका लेखाचे अभिवाचन केले.

कोकण-मराठी-साहित्यपरिषदेच्या समन्वयक प्रा. दीपा ठाणेकर व इतर सदस्य तसेच डी. जी. रुपारेल महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक ह्यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम उत्तम प्रकारे संपन्न झाला.

- **रुतिका कांबळे.** (द्वितीयवर्ष, कला.)

---

रक्तरेषा




दि. १२ ऑक्टोबर, २०१८ रोजी डी. जी. रुपारेल महाविद्यालयातील मराठी-वाङ्मय-मंडळामध्ये प्रथमवर्ष कलाशाखेच्या अभ्यासक्रमातील 'राहिले दूर घर माझे' ह्या साहित्यकृतीच्या अध्ययनासाठी पूरक उपक्रम म्हणून फाळणीविषयीच्या साहित्यावर आधारित 'रक्तरेषा' हा विशेष कार्यक्रम सादर करण्यात आला.

१९४७ साली फाळणीमुळे भारत व पाकिस्तान ह्या दोन्ही देशांतील अनेकांनी आपला मुलूख सोडून जाण्याचे दुःख सोसले, अनेक वेदना सोसल्या. ह्या विषयाचे चित्रण श्री. शफाअत खान ह्यांनी 'राहिले दूर घर माझे' ह्या नाटकात केले आहे. फाळणीमुळे भारत-पाकिस्तानामध्ये जी सीमा आखली गेली ती एखाद्या

रक्तरेषेसारखी भासते. ह्या विषयावरील विद्यार्थ्यांच्या मनातील भावना, विचार व्यक्त करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम सादर करण्यात आला.

ह्या कार्यक्रमात असगर वजाहत ह्यांच्या 'जिस लाहोर नहीं देख्या ...' आणि शफाअत खान ह्यांच्या 'राहिले दूर घर माझे' ह्या नाटकांतील काही दृश्यांचे सादरीकरण करण्यात आले. ह्या कार्यक्रमात फाळणीविषयीच्या काही लेखकांच्या कथा, किस्से, कविता ह्यांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी काही स्वरचित कथा आणि कविताही सादर केल्या, फाळणीविषयक कवितेवर नृत्यही सादर करण्यात आले. 'राहिले दूर घर माझे' ह्या नाटकाचे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या रीतीने आकलन व्हावे ह्यासाठी ह्या नाटकाचे लेखक श्री. शफाअत खान ह्यांच्या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुलाखतीची ध्वनिचित्रफीतही ह्या कार्यक्रमात दाखविण्यात आली.

हा कार्यक्रम प्रथमवर्षाच्या विद्यार्थ्यांनी सादर केला होता. प्रथमवर्षातील विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी, लिहिण्यासाठी आणि सादरीकरण करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून ह्या कार्यक्रमाची आखणी केली गेली. ह्या कार्यक्रमाला रुपारेलमधील प्राध्यापक आणि विद्यार्थी ह्यांनी भरघोस उपस्थिती दर्शविली.

- **अदिती तरडे.** (प्रथमवर्ष, कला.)



जन्म : ५ सप्टेंबर, १९६७

मृत्यू : २७ सप्टेंबर, २०१८

मित्राला
चांदणीनं
झाकोळून टाकलं आहे
ती कोसळेल बनून
उल्का
तेव्हा पुन्हा दिसेल
मित्र
आकाशगंगेत
पोहणारा

(कविता महाजन ह्यांच्या फेसबुक नोंदीतून)

सहितौतर्फे कविता महाजन ह्यांना भावपूर्ण आदरांजली.